## थोडक्यात...

## पवार महाविद्यालयात शहीद दिन साजरा



(असद शेख/दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** येथील स्वातंत्र्यसैनिक सूर्यभानजी पवार महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शहीद दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाच्या गृहविज्ञान विभाग प्रमुख तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सुरेखा भोसले या होत्या. महाविद्यालयाच्या वतीने डॉ सुरेखा भोसले यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य डॉ विजय भोपाळे , राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय कसाब, डॉ भारत चापके, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी शहीद दिनाच्या निमित्ताने शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. संजय कसाब यांनी मांडले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. प्रभाकर कीर्तनकार यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.डॉ. भारत चापके यांनी मानले . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. संजय कसाब, डॉ. भारत चापके , राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी मोठ्या प्रमाणात परिश्रम घेतले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शहीद दिनानिमित्त जिंतूरात भव्य पदयात्रा

**परभणी-** जिल्ह्यातील जिंतूर शहरात केंद्र शासनाच्या ‘मेरा युवा भारत’ अभियानांतर्गत तसेच कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाच्या वतीने शहीद दिनानिमित्त भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. देशाची एकता, अखंडता व राष्ट्रभक्तीचा संदेश समाजात रुजविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषद मैदान ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा असे पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. या पदयात्रेत विद्यार्थी, शिक्षक व नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. पदयात्रेला पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे, जिल्हा युवा अधिकारी शशांक राऊला, मुख्याध्यापिका श्रीमती राठोड, जिल्हा समन्वयक दीपक खुळे, स्नेहा वाघमारे तसेच दूरदर्शन-आकाशवाणीचे जिल्हा प्रतिनिधी सुदर्शन चापके यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून प्रारंभ करण्यात आला.

तत्पूर्वी उपस्थित मान्यवरांनी स्वच्छतेची शपथ घेतली. प्रास्ताविकात जिल्हा युवा अधिकारी शशांक राऊला यांनी शहीद भगतसिंग, राजगुरू व सुखदेव यांच्या देशासाठी दिलेल्या बलिदानाचा इतिहास उजागर करून उपस्थितांना प्रेरित केले.

# जागतिक ग्राहक दिन : सजग ग्राहकच सुरक्षित ग्राहक - जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण

**परभणी -** नागरिकांनी खरेदी करताना सतर्कता बाळगावी, प्रत्येक व्यवहारात पारदर्शकता ठेवावी आणि आपले ग्राहक हक्क जाणून त्यांचा योग्य वापर करावा. अन्याय झाल्यास तक्रार नोंदविण्यास मागे न राहता, जागरूक ग्राहक बनून सशक्त समाज घडविण्यास हातभार लावावा. सजग ग्राहक हाच सुरक्षित ग्राहक असतो, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले.

जागतिक ग्राहक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात आज कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी बोलत होते. अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी



अनुराधा ढालकरी, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे, जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे, अखिल भारतीय ग्राहक मंच देवगिरी प्रांताचे अध्यक्ष विलास मोरे, ग्राहक मंचाचे सदस्य गोविंद देशमुख, आर्थिक साक्षरता सल्लागार श्री. हट्टेकर तसेच शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी ग्राहकांनी नेहमी सजग व जागरूक राहण्याचे आवाहन केले. खरेदी करताना वारंटी व गॅरंटी यातील फरक समजून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वस्तू खरेदी करताना बिल घेणे, त्यावर जीएसटी क्रमांक तपासणे, तसेच वस्तूवरील मानांकन, स्टार रेटिंग आणि वीज वापर याची माहिती जाणून घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून ते ग्राहक व उत्पादक या दोन्ही भूमिका निभावतात, त्यामुळे प्रामाणिकपणा व योग्य वर्तन आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच त्यांनी भारतातील ग्राहक चळवळीचा इतिहास सांगताना बिंदू माधव जोशी यांनी उभारलेल्या चळवळीमुळे १९८६ चा ग्राहक संरक्षण कायदा अस्तित्वात आला, असे सांगितले. तक्रार निवारण यंत्रणेची माहिती प्रत्येक नागरिकाला असणे गरजेचे असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव भूषण काळे यांनी मनोगतात विधी सेवा प्राधिकरणामार्फत विनामूल्य कायदेशीर सल्ला दिला जातो, याचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. त्यांनी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ व २०१९ मधील तरतुदींचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रास्ताविक जिल्हा पुरवठा अधिकारी विलास मुसळे यांनी केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी आपल्या हक्कांची जाणीव ठेवून योग्य पद्धतीने तक्रार नोंदवावी, असे त्यांनी सांगितले.

आर्थिक साक्षरता सल्लागार श्री. हट्टेकर यांनी डिजिटल फसवणुकीबाबत जागरूक राहण्याचे आवाहन करत कोणालाही ओटीपी किंवा संशयास्पद लिंक शेअर करू नये, असे सांगितले. ग्राहक मंचाचे सदस्य गोविंद देशमुख यांनी १९१५ हा टोल-फ्री क्रमांक सेव्ह करून तक्रार नोंदवण्याचे मार्गदर्शन केले, तसेच ऑनलाइन तक्रार प्रक्रियेची माहिती दिली.

अखिल भारतीय ग्राहक मंच देवगिरी प्रातांचे अध्यक्ष विलास मोरे यांनी ग्राहक चळवळीचा इतिहास प्रभावी शैलीत मांडत १९७२ च्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्त्व अधोरेखित केले. १९८६ व २०१९ च्या कायद्यातील बदलही त्यांनी थोडक्यात स्पष्ट केले.

कादंबरीकार राजेंद्र गहाळ यांनी आपल्या विनोदी शैलीत ग्राहक संरक्षण कायद्याचे महत्त्व स्पष्ट केले. पर्यावरण प्रमुख संगीता अवचार यांनी वाढते प्रदूषण आणि पर्यावरण संरक्षणाची गरज याकडे लक्ष वेधले. कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री. वायकोस यांनी ग्राहक संरक्षण कायद्याविषयी प्रश्नमंजुषा घेऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले.

## के. के. महाविद्यालयात शहीद दिन उत्साहात साजरा



(दशरथ शिंदे/दै.धर्मयोध्दा)

**मानवत -** येथील के. के. एम. महाविद्यालयात आज शहीद दिन उत्साहात व आदरपूर्वक साजरा करण्यात आला. यावेळी भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू यांच्या प्रतिमांचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य भास्कर मुंडे होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनात शहीदांच्या बलिदानाचे स्मरण करून विद्यार्थ्यांनी देशप्रेम, त्याग व कर्तव्यभावना अंगीकारण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. शारदा कच्छवे यांनी केले. त्यांनी शहीद दिनाचे महत्त्व स्पष्ट करताना स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाची माहिती दिली. सूत्रसंचालन प्रा. घुम्मनवाड सिद्धेश्वर यांनी केले.

या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. भास्कर मुंडे,उपप्राचार्य डॉ के. जी. हुगे , मूल्यशिक्षण समितीचे प्रमुख डॉ. पंडित मोरे, पर्यवेक्षक प्रा. अनिल कापसे,तसेच महाविद्यालयातील बहुसंख्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रम शेवटी राष्ट्रभक्तीपर वातावरणात संपन्न झाला.



**परभणी-** नवनिर्वाचित जिल्हा परिषद अध्यक्ष सौ.लताताई वाकळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची सदिच्छा भेट घेतली, यावेळी त्यांच्या समवेत भारतीय जनता पार्टीचे नेते मा.आ.रामप्रसाद बोर्डीकर, जिल्हाप्रमुख सुरेश भुमरे व भारतीय जनता पार्टीच जिल्हापरीषद सदस्य दिलीप देशमुख आदिंसह पदाधिकार उपस्थित होते. (छाया-गजानन चव्हाण)

# ‘चिमुकल्या प्रतिभेचा राज्यात डंका!’ आराध्या घायतिडक राज्यात प्रथम; विमलाबाई देशमुख कन्या शाळेची अभूतपूर्व कामगिरी

(मनोज पाटील/ दै.धर्मयोध्दा)

**अहमदपुर-** शिक्षण क्षेत्रात पुन्हा एकदा उज्वल कामगिरी करत विमलाबाई देशमुख कन्या प्राथमिक शाळेने ऑलिंपियाड स्पर्धा परीक्षेत दणदणीत यश संपादन केले आहे. इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी आराध्या घायतिडक हिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावत संपूर्ण शाळेचा आणि अहमदपूर शहराचा मान उंचावला आहे. या यशाने शाळेत आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, विद्यार्थिनींच्या कष्टाला आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनाला मिळालेली ही मोठी दाद मानली जात आहे. आराध्यासोबतच




इयत्ता पहिलीतील आरोही घायतिडक, कनिष्का बेंबडे, आरोही कुंटे यांनी मेरिट यादीत स्थान मिळवून ट्रॉफी पटकावली, तर पूर्वा गंगापुरे व आराध्या गंगापुरे यांनी गोल्ड मेडल मिळवले. इयत्ता दुसरीतील विद्यार्थिनींनीही आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत यशाची परंपरा कायम राखली. श्रेया मनदुमले, वेदिका मेकले, तेजस्वी मुंढे, हर्षदा अंबुलगेकर, निधी चामले, वैभवी पेड, स्वरा येलगट्टे, जीविका वाघबीजे यांनी ट्रॉफी मिळवली, तर मरियम शेख, खुशी बडगिरे आणि प्रियल राठोड यांनी गोल्ड मेडल पटकावले. या सर्व यशस्वी विद्यार्थिनींचा सत्कार शाळेत मोठ्या उत्साहात करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका श्रीमती राजपंगे मॅडम होत्या, तर प्रमुख पाहुण्या म्हणून माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती कोयले मॅडम उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते विद्यार्थिनी व शिक्षकांचा सन्मान करण्यात आला.

या यशामागे स्पर्धा परीक्षा विभाग प्रमुख विशेषतः इयत्ता पहिलीच्या श्रीमती मुंडकर मॅडम आणि कुलकर्णी मॅडम तसेच इयत्ता दुसरीच्या श्रीमती श्रद्धा खलसे मॅडम व श्रीमती प्रतिभा गोरटे मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती वनिता मुंडकर मॅडम यांनी केले, तर आकर्षक फलक लेखन श्रीमती जयश्री गेडेवाड मॅडम यांनी साकारले. आभार प्रदर्शन श्रीमती सुलचना कुलकर्णी मॅडम यांनी केले.

शाळेच्या अध्यक्षा श्रीमती सिमाताई देशमुख व सचिव श्री पी. डी. कदम यांनी सर्व विद्यार्थिनींचे मनापासून अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती बुजरूग मॅडम, श्री कनकुरे सर, श्री गळगे सर आदींनी सहकार्य केले. या दैदिप्यमान यशामुळे ‘विमलाबाई देशमुख कन्या शाळा’ अहमदपूरच्या शैक्षणिक नकाशावर अधिक उजळून निघाली असून, भविष्यातही अशाच यशाची परंपरा कायम राहील, असा विश्वास व्यक्त होत आहे.

## देवनांद्रा जि.प. शाळेचा वर्ड चॅम्पियन स्पर्धेत दबदबा; दोन विद्यार्थ्यांचा तालुक्यात प्रथम क्रमांक





(गणेश जत्ती/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** जिल्हा परिषद शिक्षण विभाग, परभणी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘वर्ड चॅम्पियन’ स्पर्धेत जि.प. प्रा. शाळा देवनांद्रा (सा.का.प), ता. पाथरी येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत तालुक्यात आपला ठसा उमटवला आहे. शब्द अंकुर गट (इयत्ता ३री ते ५वी) या गटातून शाळेचे विद्यार्थी अर्णव विनोद जुकटे व आदित्य बाबुराव गायकवाड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला. त्यांच्या या यशामुळे शाळेचा तसेच परिसराचा गौरव वाढला आहे.

या यशामागे मार्गदर्शक शिक्षक पोपळघट यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून मुख्याध्यापक महिपाल तसेच प्रभारी मुख्याध्यापक भागवत यांचेही विशेष योगदान आहे. शाळेतील सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सातत्याने प्रोत्साहन देत स्पर्धेसाठी सक्षम तयारी करून घेतली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी राठोड व केंद्रप्रमुख सानप यांनी अभिनंदन करत पुढील जिल्हास्तरीय फेरीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या यशामुळे देवनांद्रा येथील जि.प. शाळेची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

# १५ हजार विद्यार्थ्यांमधून माही महाजनचा २२ वा क्रमांक; विविध मान्यवरांकडून सत्कार



**सेलू -** तालुक्यातील चिकलठाणा बु. येथील जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थिनी कु. माही शिवहर महाजन हिने जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवले आहे. जिल्ह्यातील सुमारे १५,००० विद्यार्थ्यांमधून माहीने २२ वा क्रमांक ( २२) मिळवत शाळा व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशाबद्दल चिकलठाणा बु. येथील जि. प. शाळेत माही तसेच तिच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थिनीचा पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमावेळी शाळेतील रासवे मॅडम, कोतवार मॅडम व कोतवार सर उपस्थित होते. त्यांनी माहीच्या यशाबद्दल अभिनंदन करून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच गजानन महाराज गुरुकुल, परभणी येथील संचालक श्री पाते सर व त्यांच्या टीमच्या वतीनेही माहीचा सत्कार करण्यात आला. याशिवाय उमेद कार्यालयाच्या टीमच्या वतीनेही माही व तिच्या पालकांचा सन्मान करण्यात आला. माहीच्या या यशामुळे शाळा व गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून गावातील नागरिक, पालक व शिक्षकांनी तिचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बिबट्याच्या हल्ल्या पासून बचाव कसा करावा याबाबत नागरी निवारा संकल्प सहनिवास वसाहतीतील रहिवाश्यांना वनविभागातर्फे जनजागृती अभियानाद्वारे मार्गदर्शन

(दिनेश मराठे/दै.धर्मयोध्दा)

**मुंबई -** परिसरात बिबट्यांचा वाढता वावर...प्राण्यावर करण्यात आलेले हल्ले...यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली भीती... याप्रश्नी रहिवाश्यांना दिलासा देण्यासाठी नागरी निवारा येथील संकल्प सहनिवास वसाहतीमधील राहिवाश्यांमध्ये जनजागृती करून त्यांच्या मनातील शंका दूर करून येथील वातावरण भयमुक्त करण्यासाठी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील वनअधिकारी यांनी जनजागृती अभियानात केलेल्या मार्गदर्शनास रहिवाश्यांनी उत्तम प्रतिसाद दिला. वनअधिकारी यांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे येथील वातावरण भयमुक्त होण्यास मदत झाली आहे. गेल्या काही दिवसात नागरी निवारा परिषद येथील संकल्प सहनिवास संकुल तसेच रहेजा हाईट्स सोसायटीत भक्ष्य शोधण्यासाठी बिबट्यांचा वावर वाढल्याने या परिसरातील हजारो राहिवाश्यांमध्ये बिबट्याच्या दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. भीतीची बाब म्हणजे हे बिबटे



सायंकाळी ७ वाजताच या परिसरात दिसून येत असल्याने संध्याकाळी ७ नंतर घरच्या बाहेर पडायचे कि नाही? असा प्रश्न येथील राहिवाश्यांना पडला होता. त्यामुळे यांचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी येथील रहिवाशांनी केली होती. स्थानिक खासदार व आमदार या दोन्ही लोकप्रतिनिधी यांनीही याची गंभीर दाखल घेत वनविभागाशी संपर्क साधत कुठलीही अप्रिय घटना घडण्यापूर्वी तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित अधिकारी याना दिल्या होत्या. वनअधिकारी यांनी देखिय तातडीने परिसराची पाहणी करून उपाययोजना करण्यास सुरुवात केली. रीह्वाश्यांसाठी जनजागृती अभियान ठेवण्याची सूचना हि त्यांनी केली होती. त्यानुसार या अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. या अभियानात वनअधिकारी हेमंत फणसे यांनी, बिबट्याच्या हल्ल्यापासून कुठली काळजी घ्यायची...बिबट्या समोर आला तर काय करावे व काय करून नये याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर निखील बनगर यांनी बिबट्याची सायकोलॉजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तर निकेत शिंदे यांनी संकल्प सहनिवास परिसरात वनविभागातर्फे करण्यात आलेल्या उपाययोजना याबाबत उपस्थितांना माहिती दिली. तसेच ज्या परिसरात बिबट्याचा वावर वाढला आहे त्या ठिकाणीची स्वच्छता करण्यात यावी, जास्त लाईटची व्यवस्था करण्यात यावी, संरक्षण जाळ्यांची उंची वाढवण्यात यावी, अशा सूचना देण्यात आल्या. बिबट्याचा येण्याचा मार्ग व वेळ समजण्यासाठी या परिसरात विविध ठिकाणी सीसी कॅमेरे लावण्यात आले असून, या उपाययोजना करूनही बिबट्याचा वावर कमी झाला नाही तर वनविभागाच्या नियमानुसार बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावण्यात येईल, असे शिंदे यांनी सांगितले. मुंबई महानगरपालिकेच्या पी दक्षिण विभागातील आरोग्य खात्यातील डॉ.यादव यांनी, भटकी कुत्री, मांजर याबाबत महानगरपालिकेची जबाबदारी याबाबतची सविस्तर माहिती दिली. या जनजागृती अभियानात वनअधिकारी निकेत शिंदे, निखील बनगर, हेमंत फणसे, मुंबई महानगरपालिकेच्या पी दक्षिण विभागातील आरोग्य खात्याचे डॉ. यादव यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन संकल्प सहनिवास फेडरल सोसायटीचे अध्यक्ष अरुण साटम, सचिव हनुमंत सुळे, सुबोध महाडिक, यांनी केले होते. यात सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष धनंजय पाणबुडे, महासंघाचे पदाधीकारी संग्राम राणे स्थानिक रहिवाशी उपस्थित होते. रहिवाश्यांनी उपस्थित राहून आपल्या शंकांचे निरसन केले.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**
DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao